# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

सिडको भवन,(दक्षिण कक्ष), बेलापूर, नवी मुंबई-४०० ६१४
दूरध्वनी : २७५७१६७३, २७५७०१६६ व २७५७८४०९
ई-मेल : ms@mjp.gov.in/ cao@mjp.gov.in

जा.क्र.मजीप्रा-२०२३/प्र.क्र.१९/बैठक-१५७/आ-४, दिनांक :- ८ /१०/२०२४

**प्रति,**
मा.मंत्री, नगर विकास तथा प्राधिकरणाचे सह अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.मंत्री, ग्राम विकास तथा प्राधिकरणाचे सह अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
अपर मुख्य सचिव (उर्जा) उद्योग, उर्जा कामगार विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (न.वि.२) नगर विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (व्यय) वित्त विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.

**विषय :** दि.३० सप्टेंबर, २०२४ रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या १५७ व्या बैठकीचे इतिवृत्त.

महोदय,

दिनांक ३० सप्टेंबर, २०२४ रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या १५७व्या बैठकीचे इतिवृत्त आपल्या माहितीसाठी सोबत सादर करण्यात येत आहे.

मान्यतेने.

आपली विश्वासू,

(दिपाली देशपांडे-सावेडकर)
**मुख्य प्रशासकीय अधिकारी**

सोबत :- इतिवृत्ताची प्रत

म.जी.प्रा. नवी मुंबई
अभियंता
शाखा
आवक क्र.
दिनांक:-

प्रत: मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा अध्यक्ष, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई, यांचे माहितीसाठी.

प्रत: **माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.**

- मा.मिशन संचालक, राज्य पाणी व स्वच्छता मिशन, बेलापूर नवी मुंबई
- संचालक (वित्त), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, नवी मुंबई.
- उप सचिव (पापु-२३), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
- मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, ठाणे/पुणे/नाशिक/छत्रपती संभाजीनगर/अमरावती/नागपूर.

Recd
8/10/24

..२/-

- अधीक्षक अभियंता (मुख्यालय), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
- अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, म.नि.सं. व सं.कक्ष, मित्तल चेंबर्स, मुंबई.
- उप अभियंता (आय.टी.सेल), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई.

सोबतचे इतिवृत्तातील आपल्या कार्यालयाशी संबंधीत कार्यक्रम बाबींवर योग्य ती कार्यवाही त्वरित करुन केलेल्या कार्यवाहीचा कार्यपुर्ती अहवाल १० दिवसांत मध्यवर्ती कार्यालयास सादर करावा.

**महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या १५७व्या बैठकीचे इतिवृत्त.**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाची १५७वी बैठक मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष, मा.श्री.गुलाबराव पाटील यांचे अध्यक्षतेखाली ७वा मजला, मुख्य इमारत, परिषद सभागृह क्र.४, मंत्रालय, मुंबई येथे सोमवार दिनांक ३० सप्टेंबर, २०२४ दुपारी १२.०० वाजता संपन्न झाली. या बैठकीस महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाचे खालील सदस्य उपस्थित होते.

१) मा.श्री.गुलाबराव पाटील, मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे संचालक मंडळाचे पदसिध्द अध्यक्ष.

२) मा.श्री.गिरिष महाजन, मंत्री, ग्रामविकास तथा प्राधिकरणाचे संचालक मंडळाचे पदसिध्द सहअध्यक्ष.

३) श्री.संजय खंदारे, प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय मुंबई तथा प्राधिकरणाचे संचालक मंडळाचे सदस्य

४) श्री.अभिषेक कृष्णा, सदस्य सचिव म.जी.प्रा.मुंबई तथा प्राधिकरणाचे संचालक मंडळाचे सदस्य सचिव

या व्यतिरिक्त सदर बैठकीस खालील अधिकारी उपस्थित होते.

१) श्रीमती दिपाली देशपांडे-सावेडकर, मुख्य प्रशासकीय अधिकारी, म.जी.प्रा. मुंबई.

२) श्रीमती राजश्री ठोकळ, संचालक (वित्त) प्रभारी, म.जी.प्रा., सिडको भवन, नवी मुंबई.

३) श्री.अजय सिंह, अधीक्षक अभियंता (मु.), म.जी.प्रा.मुंबई.

४) श्रीमती वैशाली आवटे, मुख्य अभियंता प्रभारी, म.जी.प्रा. प्रादेशिक विभाग, पुणे.

सर्व प्रथम सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले. त्यानंतर मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष, यांच्या परवानगीने बैठकीस सुरुवात करण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र. १:-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या च्या १५६व्या बैठकीच्या इतिवृत्तास मान्यता देणे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाची १५६वी बैठक दिनांक २३ जुलै, २०२४ रोजी संपन्न झाली. सदर बैठकीच्या इतिवृत्तास मान्यता प्रदान करण्याचा प्रस्ताव संचालक मंडळास सादर करण्यात आला व त्यास मान्यता प्रदान करण्याची विनंती सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी संचालक मंडळास केली.

इतिवृत्तावर चर्चा होऊन, १५६व्या बैठकीच्या इतिवृत्तास संचालक मंडळाने मान्यता दिली.

**कार्यक्रम बाब क्र. २:-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १५६व्या बैठकीपुढील बाबींवर करण्यात आलेल्या कृतीस मान्यता देणे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाची दिनांक २३ जुलै, २०२४ रोजी संपन्न झालेल्या १५६व्या बैठकीमध्ये जे निर्णय घेण्यात आले, त्या निर्णयाच्या अनुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने केलेल्या कार्यवाहीबाबत सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी संचालक मंडळास अवगत केले. त्यानुसार १५६व्या बैठकीपुढील बाबींवर करण्यात आलेल्या कार्यवाहीस मान्यता देण्यात आली.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र.३ :-** अमृत-२ अभियानांतर्गत अमरावती पाणी पुरवठा योजना जि.अमरावती अमृत अभियानाच्या वित्तीय आकृतीबंधानुसार नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या हिश्याची रक्कम म.जी.प्रा.च्या घसारा निधीतून परतावा करण्याच्या अटीवर मान्यता देणे व प्राप्त देयकानुसार योजनेवर होणाऱ्या वाढीव खर्चाबाबत.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, संचालक मंडळाची १५७ वी बैठक दि.३०.०९.२०२४ रोजी संपन्न झाली. सदर बैठकीत प्राधिकरणाची अमृत-२ अभियानांतर्गत अमरावती पाणी पुरवठा योजनेंतर्गत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत चालविण्यात येत असलेल्या, अमरावती पाणी पुरवठा केंद्राच्या बाबतीत प्रशासकीय मंजूरीच्या शासन निर्णयातील वित्तीय आकृतीबंधानुसार नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या हिश्श्याचा (मजीप्राच्या हिश्श्याचा) कार्यक्रम बाब.३ अन्वये संचालक मंडळाने मान्यता प्रदान करुन खालील प्रमाणे ठराव पारित केला.

**ठराव :** -

असा ठराव करण्यात येतो की, अमरावती पाणी पुरवठा योजनेंतर्गत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत चालविण्यात येत असलेल्या, अमरावती पाणी पुरवठा केंद्राच्या बाबतीत प्रशासकीय मंजूरीच्या शासन निर्णयातील वित्तीय आकृतीबंधानुसार नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या हिश्श्याचा (मजीप्राच्या हिश्श्याचा) निधी रु.२९५.६५ कोटी त्याचप्रमाणे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या निविदा समितीची बैठक क्र.१७० दि.६.०८.२०२४ मधील निर्णयानुसार, या योजनेच्या निविदेकरीता प्राप्त न्यूनत्तम देकार ९.७८% जादा दराने निविदा स्वीकृत करण्यात आली असून, जादा देकारानुसारचा रु.९०.९५ कोटी अपेक्षित वाढीव खर्च असे एकूण रु.३८६.६० कोटी इतकी रक्कम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या घसारा निधीतून या संपूर्ण रक्कमेची परतफेड करण्याच्या अटीवर उपलब्ध करुन देण्यास मा.संचालक मंडळ मान्यता देत आहे. या प्रकरणी पुढील अटी व शर्तीचे काटेकोर पालन करण्यात यावे.

१. सदर योजनेसाठी रु.३८६.६० कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्यापूर्वी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे पुरेसा निधी उपलब्ध असल्याची खातरजमा संचालक (वित्त) यांनी करणे आवश्यक राहील.
२. सदर रक्कमेच्या परतफेडीसाठी कार्यक्रम बाबीमध्ये गृहीत धरण्यात आलेला २५ वर्षाच्या कालावधी हा खूपच जास्त आहे. त्यामुळे सदर कालावधी शक्य तितका कमी करावा. त्यानुसार पाणी पट्टीच्या दराची परिगणना करून निश्चित करावा. सदर निश्चित करण्यात आलेल्या पाणीपट्टीच्या दरास मा.संचालक मंडळाची मान्यता घेतल्यानंतर त्याप्रमाणे पाणीपट्टी वसूल करण्याची जबाबदारी मुख्य अभियंता यांची राहील.
३. याबाबत अमरावती महानगरपालिके सोबत करार करण्यात यावा.
४. अमृत-२ अंतर्गत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या घसारा निधीतून भरावयाच्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या हिश्याच्या रक्कमेच्या परतफेडीकरीता गृहित धरण्यात आलेली रक्कम ही, विविध संस्थाकडून नुकत्याच केलेल्या पाण्याच्या मागणीच्या अनुषंगाने येणारी अपेक्षित पाणीपट्टी, अंशदान, अमरावती महानगरपालिकेची भविष्यात होणारी हद्दवाढ इ. वर अवलंबून आहे. सदर अपेक्षित पाणीपट्टी व अंशदान

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

यामध्ये उपरोक्त नमूद केलेली वाढ विचारात घेऊन पाणीपट्टी वसूल करण्याची जबाबदारी मुख्य अभियंता यांची राहील.

५. अमरावती महानगरपालिकेकडील पाणीपट्टीची थकबाकी महानगरपालिकेकडे पाठपुरावा करुन वसूल करण्याची जबाबदारी मुख्य अभियंता यांची राहील.

६. नवीन नळ जोडण्यासाठी म.जी.प्रा. परिपत्रक दि.२५.६.२०२१ नुसार गृहित धरण्यात आलेली लोकसहभागाची रक्कम रु.१७.७० कोटी वसूल करण्याची जबाबदारी मुख्य अभियंता यांची राहील.

वरीलप्रमाणे याबाबतीत पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.४ :-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सन २०२१-२२ चे वार्षिक लेखा मंजूरीबाबत.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, संचालक मंडळाची १५७ वी बैठक दि.३०.९.२०२४ रोजी संपन्न झाली. सदर बैठकीत प्राधिकरणाचे सन २०२१-२२ या वर्षाचे वार्षिक लेखे संचालक मंडळाच्या अवलोकनार्थ व मान्यतेसाठी सादर करण्यात आले. वार्षिक लेख्याबाबतची सविस्तर माहिती संचालक मंडळास देण्यात आली. चर्चेअंती सन २०२१-२२ च्या वार्षिक लेख्यास, कार्यक्रम बाब क्र.४ अन्वये संचालक मंडळाने मान्यता प्रदान केली. खालील प्रमाणे ठराव पारित केला.

**ठराव :-**

१) असा ठराव करण्यात येतो की, सन २०२१-२२ या वर्षाचे वार्षिक लेखे स्विकृत करण्यात आले आहेत.

२) असाही ठराव करण्यात येतो की, सन २०२१-२२ या वर्षाचे वार्षिक लेखे प्राधिकरणाच्या वतीने प्राधिकरणाचे मा.अध्यक्ष व सदस्य सचिव यांनी प्रमाणित करावेत.

३) तसेच असाही ठराव करण्यात येतो की, स्वीकृत लेख्यांमध्ये मांडण्यात आलेल्या कामाच्या निष्कर्षामध्ये ज्यांच्यामुळे कोणताही महत्वाचा फरक पडणार नाही. अशा किरकोळ स्वरुपाच्या दुरुस्त्या प्राधिकरणाच्या संचालक (वित्त) व सदस्य सचिव यांच्या स्वाक्षरीने करता येतील.

४) स्वीकृत लेखा महालेखापाल नागपूर, यांना लेखा परिक्षणासाठी उपलब्ध करुन देणे इत्यादीसाठी सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.५ :-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा सन २०२१-२२ चा वार्षिक प्रशासनिक अहवाल संचालक मंडळाच्या मान्यतेसाठी ठेवणे बाबत.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा सन २०२१-२२ च्या वार्षिक प्रशासनिक अहवालाबाबत सदस्य सचिव यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मा.संचालक मंडळास अवगत केले. सदर कार्यक्रम बाबीवर सविस्तर चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**ठराव :-**

असा ठराव पारित करण्यात येतो की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा सन २०२१-२२ या वर्षाचा वार्षिक प्रशासनिक अहवाल स्विकृत करण्यात येत असून तो विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहात पटलावर ठेवण्याच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.६ :-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या निविदा समितीने घेतलेल्या निविदा स्विकृतीच्या/अस्विकृतीच्या निर्णयांवर शिक्कामोर्तब करणेबाबत.

सदर कार्यक्रम बाबीबाबत सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी संचालक मंडळास पुढीलप्रमाणे अवगत केले.

मा. संचालक मंडळाच्या १५४व्या बैठकीत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या निविदा समितीच्या १४६ ते १६२ व्या बैठकीमध्ये घेण्यात आलेल्या निविदा स्विकृती/अस्विकृतीच्या निर्णयांना मान्यता दिलेली आहे. याबाबतच्या इतिवृत्तास दि.०९.०१.२०२४ रोजी संपन्न झालेल्या मा. संचालक मंडळाच्या १५५ व्या बैठकीत मान्यता प्राप्त झालेली आहे.

तद्नंतर संपन्न झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या निविदा समितीच्या १६३ व्या बैठकीपासून १७०व्या बैठकीपर्यंतच्या बैठकांमध्ये निविदा स्विकृती/अस्विकृतीच्या घेतलेल्या निर्णयांवर मा. संचालक मंडळाने शिक्कामोर्तब करण्याची कार्यक्रम बाब सादर करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने स्वीकृत करण्यात आलेल्या निविदा व त्यांच्या देकाराचे विवरण पुढीलप्रमाणे आहे.

(रुपये कोटीत)

| कार्यक्रम बाब क्रमांक | योजनेचे नाव | निविदेतील कामांची अंदाजित किंमत | ठेकेदाराचा देकार व किंमत | ठेकेदाराचे नाव | मुल्यांकित किंमत व त्यावर येणारा देकार | स्वीकृत/ अस्वीकृत |
|---|---|---|---|---|---|---|
| | मा. निविदा समिती १६३ वी बैठक दि.१४.०३.२०२३ | | | | | |
| १. | विजयदुर्ग व १७ गावे (टप्पा-१) प्रादेशिक पाणी पुरवठा योजना, ता. देवगड, जि.सिंधुदूर्ग (तृतीय मागणी) | रु.५४.३४ कोटी | ११.००% जादा दर रु.६०.३१ | मे. जयंती सुपर कन्स्ट्रक्शन प्रा.लि., गुजरात | रु.५४.३४ १०.९९% जादा दराने | अटीच्या अधीन राहून स्वीकृत. |
| २. | मौ. वडगावपान नळ पाणी पुरवठा योजना, ता. संगमनेर, जि. अहमदनगर, (प्रथम मागणी) | रु.३०.२८ | २.४३% कमी दराने रु.२९.५५ | मे.जे. आर.फड, संगमनेर | रु.३०.२८ २.४३% कमी दराने | स्वीकृत |

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३. | मौ. गारगोटी नळ पाणी पुरवठा योजना, ता. भुदरगड, जि.कोल्हापूर (प्रथम मागणी) | रु.१८.३० | ३.२५% जादा दराने रु.१८.८९ | मे. शिव कन्स्ट्रक्शन कंपनी. | रु.१८.३० ३.२५% जादा दराने | अटीच्या अधीन राहून स्वीकृत. |
| ४. | करगणी नळ पाणी पुरवठा योजना, ता. आटपाडी जि. सांगली (द्वितीय मागणी) | रु.८.३४ | १६% कमी दराने रु.७.०० | मे. सिद्धनाथ कन्स्ट्रक्शन, सोलापूर | रु.८.३४ १६% कमी दराने | स्वीकृत |

**मा. निविदा समिती १६४ वी बैठक दि.०३.०५.२०२३**

| | | |
|---|---|---|
| १ | जल जीवन मिशन अंतर्गत जिल्हा परिषद व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मार्फत राबविण्यात येणाऱ्या पाणी पुरवठा योजनांकरीता आवश्यक असलेल्या डी.आय.के-७ व के-९ पाईपांचा पुरवठा करवून घेण्यासाठी मागविण्यात आलेल्या निविदेनूसार दरकरार मंजूर करण्याबाबत.<br>डी. आय.के-७ व के-९ प्रकारच्या पाईप पुरवठा करण्याकरीता करण्यात आलेल्या दरकरारानुसार पाईप पुरवठा करणे | स्वीकृत |

| अ.क्र. | उत्पादकाचे नाव | करारानाम्याची रक्कम (रु. कोटीत) |
|---|---|---|
| १. | मे. जय बालाजी इंडस्ट्रीज लि. | ७२० |
| २. | मे. रश्मी मेटॅलिक्स लि. | १९१० |
| ३. | मे. वेलस्पन डी. आय. पाईप लि. | ३७० |

**मा. निविदा समिती १६५ वी बैठक दि.२९.०८.२०२३**

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत जामखेड शहर पाणी पुरवठा योजना, ता. जामखेड जि. अहमदनगर (पूर्ण ठेव तत्वावर) (दुसरी मागणी) | रु.१३८.२९ | ९.८०% जादा दराने रु.१५१.८४ | मे.ईगल इन्फ्रा इंडिया लि. | रु.१४०.४५ ८.११३% जादा दराने | अटीच्या अधीन राहून स्वीकृत. |
| २. | जलजीवन मिशन कार्यक्रमांतर्गत येळगाव व २ गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजना ता. व जि. बुलडाणा (द्वितीय मागणी) | मूळ रु.२४.८५ दुरुस्ती नंतर रु.२६.९४ | रु.१.४७५% जादा दराने रु.२७.३३ | मे. ओम श्रीधर बाहेकर व बालाजी बिल्डर्स अॅन्ड डेव्हलपर्स (जेव्ही), बुलडाणा. | रु.२७.४४ ०.३८८% कमी दराने | अटीच्या अधीन राहून स्वीकृत. |
| ३. | जलजीवन मिशन कार्यक्रमांतर्गत मंठा, परतुर व जालना | रु.४.६० | ३७.३८% जादा दराने रु.६.३२ | मे.शांताई विद्युत कार्पोरेशन, | रु.६.८१ ७.२४% कमी दराने | स्वीकृत |

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | तालुक्यातील (जि. जालना) ९२ (आता ९५) गावे ग्रीड पाणी पुरवठा योजना (तृतीय मागणी) | | | जालना. | | |
| ४. | वाढीव न्हावा शेवा पाणी पुरवठा योजना टप्पा-३ ता. पनवेल जि. रायगड जलशुद्धीकरण केंद्राकरीता स्वयंचलित यंत्रणा उभारणे, शुद्ध व अशुद्ध पंपींग मशिनरीचा पुरवठा करणे, उभारणे व चाचणी देणे. (प्रथम मागणी) | रु.२६.३६ | ४२.९१% जादा दराने रु.३७.६७ | मे. योगिराज पॉवरटेक प्रा. लि. वाशी, नवी मुंबई | रु.३४.२५ ९.८८% जादा दराने | अटीच्या अधीन राहून स्वीकृत. |
| ५. | महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान कार्यक्रमांतर्गत सातारा (शाहूनगर नागरी) पाणी पुरवठा योजना ता. व जि. सातारा (प्रथम मागणी) | रु.२६.६३ | १५.८०% जादा दराने रु.३०.८४ | मे.दिपक जे भिवरे, पुणे | रु.२९.६५ ४.०२% जादा दराने | अटीच्या अधीन राहून स्वीकृत. |
| | **मा. निविदा समिती १६६ वी बैठक दि.०९.०१.२०२४.** | | | | | |
| १. | जल जीवन मिशन कार्यक्रम मंठा तालुक्यातील ९२ गावे (आता ९५ गावे) पाणी पुरवठा योजना जि. जालना ऑटोमेशनच्या कामाचा निविदा प्रस्ताव (तृतीय मागणी) | रु.४.९९ | ७.००% कमी दराने रु.४.६४ | मे. सुवास इलेक्ट्रीकल्स, ठाणे | रु.५.०२ ७.५५% कमी दराने | अटीच्या अधीन राहून स्वीकृत. |
| २. | जल जीवन मिशन कार्यक्रम पाळधी बु. व खु. पाणी पुरवठा योजना ता. धरणगाव जि. जळगाव यांत्रिकी कामाचा निविदा प्रस्ताव (तृतीय मागणी) | रु.१.५३ | ९.००% जादा दराने रु.१.६७ | मे. नंदिनी एन्टरप्रायझेस, हैद्राबाद. | रु.१.५५ ७.६७% जादा दराने | स्वीकृत |
| ३. | अंबरनाथ बदलापूर वाढीव पाणी पुरवठा | रु.१८.७८ | ३७.००% जादा दराने | मे. स्वस्तिक कंन्स्ट्रक्शन्स, | रु.१९.९५ २८.९५% | अस्विकृत |

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | योजना, ता. अंबरनाथ, जि. ठाणे Providing & constructing R.C.C. Elevated Service Reservoirs at various location in Ambernath & Badlapur cities, Lowering Laying an Jointing leading mains, rising mains of various dia in Ambernath & Badlapur (तृतीय मागणी) | | रु.२५.७३ | कोल्हापूर | जादा दराने | |
| ४. | जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत प्रगतीपथावरील योजनेतील प्रस्तावित डी. आय. पाईप्सऐवजी इतर अन्य प्रकारचे पाईप्स वापरण्याबाबत. | केंद्र शासनाचे जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत योजना विहीत वेळेत पूर्ण करण्याचे धोरण, केंद्र शासनाच्या जलशक्ती मंत्रालयाने डी.आय.पाईप ऐवजी इतर प्रकारचे पाईप वापराबाबतची शक्यता पडताळण्याच्या दिलेल्या सूचनांनूसार डी.आय/एम.एस. पाईप्सऐवजी इतर प्रकारचे पाईप्स वापरण्याबाबतच्या प्रस्तावाबाबत, मजीप्राच्या मा. निविदा समितीच्या बैठकीत चर्चा होऊन काही अटींच्या अधीन राहून निर्णय घेण्यात आला. | | | | स्विकृत |
| | **मा. निविदा समिती १६७ वी बैठक दि.२९.०२.२०२४** | | | | | |
| १. | अंबरनाथ बदलापूर वाढीव पाणी पुरवठा योजना, ता. अंबरनाथ, जि. ठाणे Providing & constructing R.C.C. Elevated Service Reservoirs at various location in Ambernath & Badlapur cities, Lowering Laying an Jointing leading mains, rising mains of various dia in Ambernath & Badlapur (द्वितीय मागणी) | रु.१४.८४ | १३.६३५% जादा दराने रु.१६.८६ | मे. इंद्रदिप कंन्स्ट्रक्शन्स कंपनी, उल्हासनगर अँड मे. ईगल इंन्फ्रा इंडिया लि. (जेव्ही) | रु.१५.३३ ९.९८% जादा दराने | अटीच्या अधीन राहून स्वीकृत. |

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २. | निविदा कलम -१५ अन्वये काम काढून घेण्याविषयीचा प्रस्ताव. महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान अंतर्गत चिमूर पाणी पुरवठा योजना, ता. चिमूर जि. चंद्रपूर | निविदेची अंदाजित किंमत रु.३२.५२ कोटी इतकी होती. सदर निविदा १०% कमी दराने रु.२९.२६ कोटी इतक्या किंमतीस स्वीकृत करण्यात आली. स्वीकृत निविदेपैकी तीन जलकुंभांचे काम जागा वेळेवर न मिळाल्याने कंत्राटदाराने स्वीकृत निविदा दराने करण्यास असमर्थता दर्शविली. त्यामुळे रु.५३.९५ लक्ष इतक्या किंमतीचे तीन जलकुंभ बांधण्याचे काम निविदा कलम १५ अंतर्गत काढून घेऊन सदर कामाची अद्ययावत दरसूची नुसार नव्याने निविदा काढण्याविषयीचा प्रस्ताव निविदा समितीसमोर सादर करण्यात आला. त्यास निविदा समितीने अटीच्या अधीन राहून मान्यता दिली आहे. | | | | अटीच्या अधीन राहून मान्यता |
| | **मा. निविदा समिती १६८ वी बैठक दि.१२.०६.२०२४** | | | | | |
| १. | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान अंतर्गत यवतमाळ वाढीव पाणी पुरवठा योजना, ता. जि. यवतमाळ | रु.७३.६८ | ९.९०% जादा दराने रु.८०.९८ | मे.ईगल इन्फ्रा.इंडिया प्रा.लि. उल्हासनगर जि. ठाणे | रु.७३.६९ ९.९०% जादा दराने | अटीच्या अधीन राहून स्वीकृत. |
| | **मा. निविदा समिती १६९ वी बैठक दि.२४.०७.२०२४** | | | | | |
| १. | नगरोत्थान महाअभियान अंतर्गत यवतमाळ भुयारी गटार योजना, ता. जि. यवतमाळ (प्रथम मागणी) | रु.४३९.०० | ९.९०% जादा दराने रु.४८२.४६ | मे.ईगल इन्फ्रा.इंडिया प्रा.लि. उल्हासनगर जि. ठाणे | रु.४३९.०० ९.९०% जादा दराने | अटीच्या अधीन राहून स्वीकृत. |
| २. | अंबरनाथ येथील २४ द.ल.लि. १८ द.ल.लि. ७.२ द.ल.लि. व ५ द.ल.लि. क्षमतेचे अशुद्ध पाण्याचे पंपिंग स्टेशन्सचे व Water Treatment Plant at Barrage (वडवली बुस्टर पंपिंग स्टेशन सहीत) दोन वर्षाकरीता परिचलन करणे. (तृतीय मागणी) | रु.६.९७ | १४.५०% जादा दराने रु.७.९८ | मे. माना इलेक्ट्रीकल अँड इंजिनिअरींग सर्व्हीसेस, बदलापूर व मे. कल्पतरु इंजिनिअर्स अँड कॉन्ट्रक्टर्स प्रा. लि. उल्हासनगर (JV) | रु.७.५९ ५.१०% जादा दराने | स्विकृत |
| | **मा. निविदा समिती १७० वी बैठक दि.०६.०८.२०२४** | | | | | |
| १. | केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियानांतर्गत | रु.७८८.१८ | ९.७८% जादा दराने | मे.ईगल- एम. के. एस. | रु.७८६.६७ ९.९८९% | अटीच्या अधीन |

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | अमरावती वाढीव पाणी पुरवठा योजना ता. जि. अमरावती (प्रथम मागणी) | | रु.८६५.२६ | (जे.व्ही) उल्हासनगर, ठाणे | जादा दराने | राहून स्वीकृत. |
| २. | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महा अभियान अंतर्गत बारामती शहर नळ पुरवठा योजना, ता. बारामती, जि. पुणे या मंजूर योजनेंतर्गत २२२ व १२८ द.ल.लि. क्षमतेच्या तलावाची गळती काढणे व दुरुस्ती करणे (तृतीय मागणी) | रु.११.८५ | १०.००% जादा दराने रु.१३.०४ | मे. एम.टी.फड अँन्ड सन्स प्रा.लि., परभणी. | रु.१२.३६ ५.४७% जादा दराने | अटीच्या अधीन राहून स्वीकृत |
| ३. | पूर्ण ठेव तत्वावर गोरेवाडा आंतरराष्ट्रीय प्राणी उद्यान पाणी पुरवठा योजना ता.जि. नागपूर (प्रथम मागणी) | रु.९.५८२ | १०.०८% कमी दराने रु.८.६१६ | मे.विजयेश प्रोजेक्ट प्रा.लि., ठाणे | रु.९.५८ १०.०६% जादा दराने | स्विकृत |

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मा. निविदा समितीच्या १६३ व्या बैठकीपासून १७० व्या बैठकीपर्यंतच्या बैठकांमध्ये वरील प्रमाणे निविदा स्विकृती/अस्विकृतीच्या घेतलेल्या निर्णयांवर सविस्तर चर्चा होऊन पुढीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव :-**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मा. निविदा समितीच्या १६३ व्या बैठकीपासून १७० व्या बैठकीपर्यंतच्या बैठकांमध्ये निविदा स्विकृती/अस्विकृतीच्या घेतलेल्या निर्णयांवर मा.संचालक मंडळाने शिक्कामोर्तब करण्यात येत असून या निविदा समितीच्या १६३ व्या बैठकीपासून १७०व्या बैठकीपर्यंतच्या घेण्यात आलेल्या निर्णयांना मान्यता देण्यात येत आहे. याबाबत पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.७ :-** जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत राज्यातील प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनांमध्ये सेंसर आधारीत आयओटी सोल्युशन अंमलबजावणी प्राधान्यक्रम २ व जिल्हा परिषदेकडील प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनांमध्ये आयओटी उपक्रम राबविण्यास मान्यता मिळणेबाबत.

**संदर्भ :** राज्य पाणी स्वच्छता मिशन मार्फत म.जी.प्रा.कडे पाठविण्यात आलेली धारिका.

सदर कार्यक्रम बाबीबाबत सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी संचालक मंडळास पुढीलप्रमाणे अवगत केले.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

प्रस्तावना :-

जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणाऱ्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांकरीता सेंसर आधारीत आयओटी सोल्युशन उपक्रमाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. सदर उपक्रमाकरीता येणारा खर्च राज्य पाणी स्वच्छता मिशनमार्फत करण्यात येणार असून त्याची मंजूरीची कार्यवाही राज्य पाणी स्वच्छता मिशनमार्फत करण्यात आली आहे.

आयओटी उपक्रमांतर्गत भाग-१ मध्ये प्रकल्पाच्या प्रत्यक्ष जागेवर डिझाईननुसार तसेच आवश्यकतेनुसार आयओटी उपकरणे/सेंसरची उभारणी करणे इ. भांडवली कामाचा समावेश आहे. त्याची किंमत रु.४३६.७८ कोटी (जीएसटी वगळून) इतकी आहे. सदर खर्चात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत चालविण्यात येणाऱ्या योजना त्याचप्रमाणे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत अंमलबजावणी करुन देखभाल व दुरुस्तीसाठी संबंधित जिल्हा परिषदेस हस्तांतरित होणार आहेत अशा प्रादेशिक योजनांचाही समावेश आहे. त्याचा प्रत्येकी ५०% हिस्सा केंद्र शासन व राज्य शासन खर्च करणार आहे. तसेच भाग-२ मध्ये Design, Implementation & maintenance of Centralized IOT Platform at State level या कामाचा समावेश आहे. त्याची किंमत रु.३०.०० कोटी (जीएसटी वगळून) असून सदर खर्च पूर्णपणे राज्य शासनाच्या हिस्स्यातून करण्याचे प्रस्तावित आहे.

उपरोक्त बाबींच्या देखभाल व दुरुस्तीच्या खर्चापोटी ५ वर्षांसाठी (एकूण भाग-१ करीता रु.१३३.२२ कोटी व भाग-२ करीता रु.२४.०० कोटी) असे एकूण १५७.२२ कोटी (जीएसटी वगळून) इतकी रक्कम पुढीलप्रमाणे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या घसारा निधीतून खर्च करण्याकरीता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मा.संचालक मंडळाच्या १५५ व्या बैठकीत प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

| देखभाल दुरुस्ती वर्ष<br>**Part-१ (४३६.७९ कोटी)** | वार्षिक दर | मंजूर रक्कम (जीएसटी वगळून) |
|---|---|---|
| I | ३% | १३.१० |
| II | ५% | २१.८४ |
| III | ७.५% | ३२.७६ |
| IV | ७.५% | ३२.७६ |
| V | ७.५% | ३२.७६ |
| **Total** | | **१३३.२२** |
| **Part-२ (३०.०० कोटी)** | १६% | २४.०० |
| **Total** | | **१५७.२२** |

त्यास मा.संचालक मंडळाने १५५ व्या बैठकीत पुढील अटी व शर्तीच्या अधीन राहून मान्यता प्रदान केली आहे.

१. ज्या योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत देखभाल व दुरुस्ती करण्यात येते, केवळ अशा

अध्यक्ष तथा<br>मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,<br>म.जी.प्रा.

योजनांकरिताच Field Instrument या बाबीच्या देखभाल व दुरुस्तीचा खर्च महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत करण्यात येईल.

२. Integrated Central Control Centre या बाबीच्या देखभाल व दुरुस्तीचा सर्व खर्च महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत करण्यात येईल.

३. सदर खर्च करताना, या खर्चाचा समावेश करुन इतर खर्चासह महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या प्रचलित पद्धतीनुसार, पाण्याचा दर प्रस्तावित करावा. तसेच सदर पाण्याच्या दराप्रमाणे पाणीपट्टीची आकारणी व वसुली करण्यात यावी.

उपरोक्त मंजूर करण्यात आलेली तरतूद महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत चालविण्यात येणा-या व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत अंमलबजावणी करण्यात येत असलेल्या व योजना पूर्ण झाल्यानंतर देखभाल व दुरुस्तीसाठी जिल्हा परिषदेस हस्तांतरण करण्यात येईल अशा एकूण ३८९ प्रादेशिक योजनांकरीता प्रस्तावित होती. त्या अनुषंगाने या उपक्रमाच्या झालेल्या प्रगतीबाबत दि.१५.०३.२०२४ रोजी मा.प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक घेण्यात आली. त्यात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत चालविण्यात येणा-या व जिल्हा परिषदेमार्फत चालविण्यात येणा-या ३८९ प्रादेशिक योजनांमध्ये काही गावामध्ये एकापेक्षा जास्त जलकुंभ अथवा एका जलकुंभातून अनेक Outlet प्रस्तावित असल्याने सदर प्रकल्पाच्या मूळ किंमतीत वाढ होत असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे मा.प्रधान सचिव यांनी या निरीक्षणाच्या अनुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास सर्व प्रादेशिक योजनांचे सर्व्हेक्षण करुन त्या सर्व्हेक्षणाच्या आधारे योजनांचा प्राधान्यक्रम निश्चित करण्याचे निर्देश दिले.

उपरोक्त निर्देशानुसार रा.पा.स्व.मि.मार्फत आय.ओ.टी. उपक्रमाकरीता नेमण्यात आलेल्या संस्थांमार्फत योजनानिहाय सर्व्हेक्षण करण्यात आले. सर्व मुख्य अभियंता यांनी सदर सर्व्हेक्षणाच्या अंती वरील ३८९ प्रादेशिक योजनांची झालेली प्रगती विचारात घेऊन त्यांचे प्रादेशिक विभागांतर्गत दोन प्रकारचे प्राधान्यक्रम निश्चित करुन सदस्य सचिव यांना प्रस्ताव सादर केले. त्यानुसार, प्राधान्यक्रम १ मध्ये मूळ मंजूर किंमतीत रु.४३६.५९ कोटी (जीएसटी वगळून) ज्या योजना नजीकच्या काळात कार्यान्वित/पूर्ण होणार आहेत, अशा योजनांचा भौतिक प्रगतीनुसार समावेश करण्यात आला. तसेच प्राधान्यक्रम २ मध्ये उर्वरीत सर्व योजनांचा समावेश करण्यात आला आहे.

प्रत्यक्ष सर्व्हेक्षणाअंती या उपक्रमाच्या मूळ मंजूर रु.४३६.५९ कोटी या रक्कमेत रु.३८६.८९ कोटी इतकी वाढ अपेक्षित आहे. त्यानुसार प्राधान्यक्रम १ मध्ये एकूण १५५ योजना (किंमत रु.४३६.५९ कोटी) व प्राधान्यक्रम २ मध्ये उर्वरीत एकूण २३४ योजना (किंमत रु. ३८६.८९ कोटी) समाविष्ट आहेत. अशा प्रकारे एकूण ३८९ योजनांकरीता उपकरणांच्या उभारणीकरिता रु.८२३.४८ कोटी (जीएसटी वगळून) इतका खर्च अपेक्षित आहे. सदर खर्चात देखभाल व दुरुस्तीचा खर्चाचा समावेश नाही. सदर उभारणीचा खर्च केंद्र व राज्य शासनामार्फत प्रत्येकी ५०% या प्रमाणात करण्यात येणार आहे. मा.प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांच्या निर्देशानुसार सदर प्रस्ताव महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत मिशन संचालक, राज्य पाणी व स्वच्छता मिशन यांना

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

सादर करण्यात आला. त्यानुसार सदर वाढीव खर्चास शासनाची मान्यता घेण्याचा प्रस्ताव राज्य पाणी स्वच्छता मिशन मार्फत, राज्य कार्यकारी समितीच्या दि.१६.०७.२०२४ रोजीच्या बैठकीत सादर करण्यात येऊन त्यास सदर समितीने मान्यता दिली आहे.

राज्य पाणी व स्वच्छता मिशनमार्फत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे प्राप्त झालेल्या संदर्भिय धारिकेमध्ये पुढीलप्रमाणे उल्लेख आहे.

१. जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कडील प्राधान्यक्रम २ मधील प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनांमध्ये आय.ओ.टी. उपक्रम अंमलबजावणीस व त्यासाठीचा अनुषंगिक खर्च रु.३८६.८९ कोटी (अधिक जीएसटी) यास मान्यता.
२. आय.ओ.टी. उपक्रमाच्या अंमलबजावणीपश्चात या उपक्रमाच्या देखभाल दुरुस्तीची जबाबदारी हस्तांतरीत करण्यात येणाऱ्या संबंधित यंत्रणा (मजीप्रा/संबंधित जिल्हा परिषद) यांची असावी, त्यास मान्यता मिळावी.

सदर प्रस्तावावर मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांनी "म.जी.प्रा. यांचे अभिप्राय घेऊन अंमलबजावणी करावी. देखभाल व दुरुस्तीच्या खर्चासाठी शासनाकडे पाठपुरावा करावा" असे निर्देश दिले.

त्यानुसार मिशन संचालक, राज्य पाणी व स्वच्छता मिशन यांच्या दि.२४.०९.२०२४ रोजीच्या टिप्पणीनुसार प्रस्ताव महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अभिप्रायार्थ सदस्य सचिव यांच्याकडे सादर करण्यात आला.

- **म.जी.प्रा.चे अभिप्राय :**

मा.संचालक मंडळाच्या १५५ व्या बैठकीत ज्या योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत चालविण्यात येणा-या आहेत, त्यांच्या देखभाल दुरुस्तीची जबाबदारी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची असल्याने केवळ महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत चालविण्यात येणा-या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांमध्ये आयओटीच्या देखभाल दुरुस्तीपोटी होणारा खर्च मजीप्राच्या घसारा निधीतून करण्याबाबत प्रस्तावित करण्यात आले असून त्यास मान्यता प्राप्त आहे.

त्यानुसार यापुर्वी या उपक्रमाच्या देखभाल दुरुस्तीसाठी होणाऱ्या खर्चाची रु.१५७.२२ कोटी (जीएसटी वगळून) इतक्या रक्कमेची तरतूद महाराष्ट्र जीवन प्राधिकरण स्तरावर करण्यात आली होती. तथापि, उपरोक्त विवेचनानुसार खर्चामध्ये वाढ होऊन आता सदर खर्चासाठी भाग १ (सेंसर उभारणे इ.) साठी रु.२५१.०२ कोटी व भाग २ (Centralized Control Centre) साठी रु.२४.०० कोटी असे एकूण रु.२७५.०२ कोटी (जीएसटी वगळून) इतक्या रक्कमेची आवश्यकता आहे. रु.२५१.०२ कोटी या रक्कमेत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत चालविण्यात येणा-या व जिल्हा परिषदेमार्फत चालविण्यात येणा-या अशा दोन्ही यंत्रणांच्या योजनांच्या उपक्रमाच्या देखभाल व दुरुस्तीचा समावेश आहे व रु.२४.०० कोटी च्या कामाची अंमलबजावणी महाराष्ट्र जीवन

| | |
|---|---|
| अध्यक्ष तथा<br>मंत्री, पा.पु. व स्वच्छता | सदस्य सचिव,<br>म.जी.प्रा. |

प्राधिकरणामार्फत करण्यात येणार आहे. सध्या जिल्हा परिषदेच्या मालकीच्या काही योजनांची अंमलबजावणी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत सुरु आहे.

देखभाल व दुरुस्तीच्या खर्चाचा सविस्तर तपशील पुढीलप्रमाणे :

(सर्व रक्कमा रु.कोटी मध्ये जीएसटी वगळून)

| देखभाल दुरुस्ती वर्ष<br>Part-१<br>(८२३.३० कोटी) | वार्षिक दर | यापुर्वी मंजूर रक्कम (जीएसटी वगळून ) | आता मंजूर करावयाची रक्कम (यापुर्वीची रक्कम अधिक्रमित करुन) (जीएसटी वगळून ) |
|---|---|---|---|
| I | ३% | १३.१० | २४.६९ |
| II | ५% | २१.८४ | ४१.१५ |
| III | ७.५% | ३२.७६ | ६१.७३ |
| IV | ७.५% | ३२.७६ | ६१.७३ |
| V | ७.५% | ३२.७६ | ६१.७३ |
| Total | | १३३.२२ | २५१.०२ |
| Part-२<br>(३०.०० कोटी) | १६% | २४.०० | २४.०० |
| Total | | १५७.२२ | २७५.०२ |

राज्य पाणी व स्वच्छता मिशनच्या कार्यकारी समितीच्या बैठकीत मिळालेल्या मान्यतेनुसार जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणाऱ्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनामध्ये आवश्यकतेनुसार आयओटी प्रणाली वापरण्याबाबत तसेच यांच्या देखभाल व दुरुस्तीपोटी होणारा भाग १ (सेंसर उभारणे इ.) साठी रु.२५१.०२ कोटी व भाग २ (Centralized Control Centre) साठी रु.२४.०० कोटी असे एकूण रु.२७५.०२ कोटी (जीएसटी वगळून) इतका खर्च तात्पुरत्या स्वरुपात सध्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या स्वनिधीतून करण्यास हरकत नाही. मात्र, ज्या योजनांची अंमलबजावणी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत पूर्ण झाल्यानंतर जिल्हा परिषदेला योजना हस्तांतरित होणार आहेत अशा योजनांच्या देखभाल दुरुस्तीचे दायित्व जिल्हा परिषदेचे राहणार आहे. सारांशाने, सदर बाबतीत पुढीलप्रमाणे निधीचे दायित्व राहील असे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे अभिप्राय आहेत.

१. ज्या योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत देखभाल व दुरुस्ती करण्यात येते, केवळ अशा योजनांकरिताच Field Instrument या बाबीच्या देखभाल व दुरुस्तीचा खर्च महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत करण्यात येईल. मात्र, ज्या योजनांची अंमलबजावणी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत पूर्ण झाल्यानंतर जिल्हा परिषदेला योजना हस्तांतरित होणार आहेत अशा योजनांच्या देखभाल दुरुस्तीचे दायित्व जिल्हा परिषदेचे राहील.

२. Integrated Central Control Centre या बाबीच्या देखभाल व दुरुस्तीचा सर्व खर्च महाराष्ट्र जीवन प्राधिकरणांमार्फत करण्यात येईल.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

३. सदर खर्च करताना, या खर्चाचा समावेश करुन इतर खर्चासह महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या प्रचलित पद्धतीनुसार, पाण्याचा दर प्रस्तावित करावा. तसेच सदर पाण्याच्या दराप्रमाणे पाणीपट्टीची आकारणी व वसुली करण्यात यावी.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत चालविण्यात येणाऱ्या ग्रामीण पाणी पुरवठा केंद्रांची मागील काही वर्षातील पाणीपट्टी आकारणी व वसूली यात तूट आहे. त्याचप्रमाणे देखभाल व दुरुस्तीसाठी स्वतंत्र निधी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे सध्या उपलब्ध नाही. सबब, सदर आयओटी उपक्रमाच्या देखभाल दुरुस्तीसाठी लागणारा निधी शासनाकडून उपलब्ध करुन घेणे आवश्यक आहे. याबाबत मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांनी "मजीप्रा यांचे अभिप्राय घेऊन अंमलबजावणी करावी. देखभाल व दुरुस्तीच्या खर्चासाठी शासनाकडे पाठपुरावा करावा" असे निर्देश दिले आहेत. या करीता वरीलप्रमाणे प्रस्तावास व निधी उपलब्धतेसाठी सविस्तर प्रस्ताव शासनास सादर करण्यास मा. संचालक मंडळाची मान्यता मिळण्याविषयीच्या कार्यक्रम बाबीवर मा.संचालक मंडळाच्या बैठकीत सविस्तर चर्चा झाली व पुढीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव :-**

असा ठराव करण्यात येतो की, राज्य पाणी व स्वच्छता मिशनच्या कार्यकारी समितीच्या बैठकीत मिळालेल्या मान्यतेनुसार जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत मजीप्रामार्फत राबविण्यात येणाऱ्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनामध्ये आवश्यकतेनुसार आयओटी प्रणाली वापरण्याबाबत तसेच यांच्या देखभाल व दुरुस्तीपोटी होणारा भाग १ (सेंसर उभारणे इ.) साठी रु.२५१.०२ कोटी व भाग २ (Centralized Control Centre) साठी रु.२४.०० कोटी असे एकूण रु.२७५.०२ कोटी (जीएसटी वगळून) इतका खर्च तात्पुरत्या स्वरुपात सध्या मजीप्राच्या स्वनिधीतून करण्यास हरकत नाही. मात्र, ज्या योजनांची अंमलबजावणी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत पूर्ण झाल्यानंतर जिल्हा परिषदेला योजना हस्तांतरित होणार आहेत अशा योजनांच्या देखभाल दुरुस्तीचे दायित्व जिल्हा परिषदेचे राहणार आहे. याबाबतचे विवरण पुढीलप्रमाणे आहे.

१. ज्या योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत देखभाल व दुरुस्ती करण्यात येते, केवळ अशा योजनांकरिताच Field Instrument या बाबीच्या देखभाल व दुरुस्तीचा खर्च महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत करण्यात येईल. मात्र, ज्या योजनांची अंमलबजावणी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत पूर्ण झाल्यानंतर जिल्हा परिषदेला योजना हस्तांतरित होणार आहेत अशा योजनांच्या देखभाल दुरुस्तीचे दायित्व जिल्हा परिषदेचे राहील.

२. Integrated Central Control Centre या बाबीच्या देखभाल व दुरुस्तीचा सर्व खर्च महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत करण्यात येईल.

३. वरीलप्रमाणे निधी उपलब्ध करुन देण्यापूर्वी मजीप्राकडे पुरेसा निधी उपलब्ध असल्याची खातरजमा संचालक (वित्त) यांनी करणे आवश्यक राहील.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

४. सदर खर्च करताना, या खर्चाचा समावेश करुन इतर खर्चासह महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या प्रचलित पद्धतीनुसार, पाण्याचा दर प्रस्तावित करावा. तसेच सदर पाण्याच्या दराप्रमाणे पाणीपट्टीची आकारणी व वसुली करण्यात यावी.

वरीलप्रमाणे प्रस्तावास मा.संचालक मंडळाने मान्यता दिली व शासनाकडे (काम न थांबवता) निधी उपलब्धतेसाठी सुद्धा प्रस्ताव पाठवावे. असे संचालक मंडळामध्ये ठरले. त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.८ :-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीच्या नागरी, ग्रामीण पाणी पुरवठा योजना, डोंगराळ/पर्यटन क्षेत्रातील पाणी पुरवठा योजना व पेरी अर्बन योजनामधून होणाऱ्या पाणी पुरवठयाचे सुधारीत दर लागू करणेबाबत.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीच्या नागरी, ग्रामीण पाणी पुरवठा योजना, डोंगराळ/पर्यटन क्षेत्रातील पाणी पुरवठा योजना व पेरी अर्बन योजनामधून होणाऱ्या पाणी पुरवठयाचे सुधारीत दर लागू करणेबाबत सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त कार्यक्रम बाब पुढे ढकलण्यात (Defered) आली.

**कार्यक्रम बाब क्र.९ :-** म.जी.प्रा.च्या मालकीच्या सर्व नागरी पाणी पुरवठा केंद्राच्या क्षेत्रात असलेल्या निवासी व अनिवासी वसाहतीतील संकुलांना/संस्थांना नवीन अथवा वाढीव नळ जोडण्या मंजूर करताना तसेच अनधिकृत नळजोडणी नियमित करताना सुधारीत दराने भांडवली अंशदान आकारण्यास मान्यता मिळण्याकरीता कार्यक्रम बाब सादर करणेबाबत.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, संचालक मंडळाची १५७ वी बैठक दि.३०.०९.२०२४ रोजी संपन्न झाली. सदर बैठकीत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीच्या सर्व नागरी पाणी पुरवठा केंद्राच्या क्षेत्रात असलेल्या निवासी व अनिवासी वसाहतीतील संकुलांना/संस्थांना नवीन अथवा वाढीव नळजोडण्या मंजूर करताना तसेच अनधिकृत नळजोडणी नियमित करताना सुधारीत दराने भांडवली अंशदान आकारण्यास मान्यता मिळण्याकरीता कार्यक्रम कार्यक्रम बाब.९ अन्वये संचालक मंडळाने मान्यता प्रदान करुन खालील प्रमाणे ठराव पारित केला.

**ठराव :-**

असा ठराव करण्यात येतो की, सर्व नागरी पाणी पुरवठा केंद्राच्या क्षेत्रात असलेल्या निवासी व अनिवासी वसाहतीतील संकुलांना/संस्थांना नवीन अथवा वाढीव नळजोडण्या मंजूर करत असताना तसेच अनधिकृत नळजोडणी नियमित करत असताना, खालील प्रमाणे सुधारीत दराने भांडवली अंशदान आकारण्यास मान्यता देण्यात येत आहे.

अ) म.जी.प्रा.च्या मालकीच्या सर्व नागरी पाणी पुरवठा केंद्राच्या क्षेत्रात असलेल्या निवासी वसाहतीतील संकुलांना नवीन अथवा वाढीव नळजोडण्या मंजूर करताना तसेच अनधिकृत नळजोडणी नियमित करताना आकारणी करावयाची भांडवली अंशदान रक्कम :

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

| अ.क्र. | सदनिका/बंगलो/ चाळ इत्यादींचे बांधकाम क्षेत्रफळ (Built Up Area) चौ. फूटामध्ये | भांडवली अंशदानाची रक्कम |
|---|---|---|
| १ | ०-५०० | रु.१,५००/- |
| २ | ५०१-१००० | रु.३,१२५/- |
| ३ | १००१-१५०० | रु.४,३७५/- |
| ४ | १५०१-२००० | रु.६,२५०/- |
| ५ | २००१-२५०० | रु.८,१२५/- |
| ६ | २५०१ व त्यापेक्षा जास्त | रु.९,३७५/- |

ब) म.जी.प्रा.च्या मालकीच्या सर्व नागरी पाणी पुरवठा केंद्राच्या क्षेत्रात असलेल्या अनिवासी संस्थांना नवीन अथवा वाढीव नळजोडण्या मंजूर करताना तसेच अनधिकृत नळजोडणी नियमित करताना आकारणी करावयाची भांडवली अंशदान रक्कम :

| अ.क्र. | खाजगी शाळा/कॉलेज/दवाखाने/इस्पीतळे/कार्यालय/बँका/दुकाने इ. बांधकाम क्षेत्रफळ (Built Up Area) चौ. फूटामध्ये | भांडवली अंशदानाची रक्कम |
|---|---|---|
| १ | ०-५०० | रु.६,९००/- |
| २ | ५०१-१००० | रु.१४,३७५/- |
| ३ | १००१-१,५०० | रु.२०,१२५/- |
| ४ | १५०१-२००० | रु.२८,७५०/- |
| ५ | २००१-२५०० | रु.३७,३७५/- |
| ६ | २५०१ व त्यापेक्षा जास्त | रु.४३,१२५/- |

क) अनधिकृत नळजोडण्या नियमित करण्यासाठी ग्राहकाने अनधिकृतपणे वापरलेल्या पाणी वापरापोटी २४ महिन्यांऐवजी १२ महिन्यांकरीता दंडणीय पाणी आकारणी करण्यात यावी. अशाप्रकारे अनधिकृत नळजोडण्या नियमित करण्यासाठी क्षेत्रीय कार्यालयांनी पुढील तीन महिन्यात विशेष मोहिम राबवावी. त्याअंतर्गत अशा मोहिमेला मोठ्या प्रमाणात व्यापक प्रसिध्दी देवून ग्राहकांना या योजनेत सहभागी होण्यासाठी एक महिन्याची मुदत द्यावी. सहभाग घेतल्यानंतर ग्राहकास भांडवली अंशदानाची व दंडणीय पाणी आकारणीची रक्कम भरण्यास एक महिन्याची मुदत द्यावी. अनधिकृत नळजोडण्या अधिकृत करुन घेण्याकरीता विहीत मुदतीत सहभाग घेतलेल्या ग्राहकांबाबत वरील प्रमाणे कार्यवाही करावी. मुदतीनंतर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या प्रचलित नियमानुसार अशा अनधिकृत नळजोडण्यांबाबत संबंधित ग्राहकांविरुध्द आवश्यक ती कठोर कारवाई विभागीय कार्यालयामार्फत करण्यात यावी.

ख) त्याचप्रमाणे नवीन अथवा वाढीव नळजोडणी देताना तसेच अनधिकृत नळजोडणी नियमित करताना वरीलप्रमाणे भांडवली अंशदानाची आकारणी करण्यात यावी.

या बाबत पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मुंबई यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**आयत्या वेळेची कार्यक्रम बाब क्र.१ :-**

**विषय :-** पोलीस प्रशिक्षण केंद्र, तुरची, ता. तासगाव, जि. सांगली येथील पूर्ण अंशदान ठेव तत्वावरील नळ पाणी पुरवठा योजनेच्या अंदाजपत्रके तयार करणेसाठी छाननी शुल्कापोटी असलेली १% रक्कम रु.११.१३ लक्ष महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना भरणेपासून सूट मिळणेबाबत.

सदर कार्यक्रम बाबीबाबत सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी संचालक मंडळास पुढीलप्रमाणे अवगत केले.

पोलीस प्रशिक्षण केंद्र, तुरची, ता. तासगाव, जि. सांगली येथील पूर्ण अंशदान ठेव तत्वावरील नळ पाणी पुरवठा योजनेच्या अंदाजपत्रके तयार करणेसाठी छाननी शुल्कापोटी असलेली १% रक्कम रु.११.१३ लक्ष महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना भरणेपासून सुट मिळणेबाबत संदर्भिय पत्रान्वये खालीलप्रमाणे कळवुन स्वयंस्पष्ट अभिप्रायासह परिपूर्ण अहवाल शासनास सादर करण्याबाबत विनंती करण्यात आली आहे.

- विषयांकित प्रकरणी गृह विभागाद्वारे पोलीस प्रशिक्षण केंद्र, तुरची, ता. तासगाव, जि. सांगली येथील नळ पाणी पुरवठा योजनेचे अंदाजपत्रके तयार करणेसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सांगली यांनी आकारलेली १% छाननी शुल्क रक्कम रु.११.१३ लक्ष भरणेपासुन सूट मिळणेबाबत विनंती करण्यात आलेली आहे.

- पोलीस प्रशिक्षण केंद्र, तुरची, ता. तासगाव, जि. सांगली येथील नळ पाणी पुरवठा योजना ही पूर्ण अंशदान ठेव तत्वावरील असून सदर योजना २०२०-२१ च्या दरसूचीवर आधारीत अंदाजे रु.१११३.३२ लक्ष इतक्या किंमतीची होणार आहे. यानुषंगाने कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सांगली यांचे कार्यालयास निरीक्षण व अंदाजपत्रके तयार करण्यासाठी छाननी शुल्कापोटी १% रक्कम रु.११.१३ लक्ष भरावे लागणार आहेत.

- यापूर्वी गृह विभागाच्या विशेष पायाभूत सुविधा योजनेसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने छाननी शुल्काची १.२५% रक्कम भरण्यापासून सुट दिली होती, असे गृह विभागाद्वारे त्यांचे टिप्पणीत नमूद केले असून याच धर्तीवर आता पाणी पुरवठा योजनेतील छाननी शुल्काची रक्कम रु.११.१३ लक्ष भरणेपासून सुट मिळणेबाबत विनंती केली आहे.

**म.जी.प्रा. मध्यवर्ती कार्यालयाचे अभिप्राय :-**

पोलीस प्रशिक्षण केंद्र, तुरची, ता. तासगाव, जि. सांगली येथील नळ पाणी पुरवठा योजनेची अंदाजित किंमत रु.१११३.३२ लक्ष इतकी असून या करीता तांत्रिक छाननी शुल्क १% रक्कम रु.११.१३ लक्ष भरावे लागणार असून सदर शुल्क भरण्यापासून सुट मिळण्याबाबत गृह विभागाद्वारे विनंती करण्यात आली आहे.

- शासनाच्या पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचा शासन निर्णय क्र. मजीप्रा-२०१४/प्र.क्र.३३ (अ)/पापु-२३, दि.२३.०३.२०१७ नुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास ईटीपी व तांत्रिक सेवा शुल्कापोटी प्राप्त होणारे उत्पन्न प्राधिकरणाने शासनाकडे दरमहा जमा करावयाचे आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

- महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मा. संचालक मंडळाच्या दि.२०.०५.२०१४ रोजी संपन्न झालेल्या १३० व्या बैठकीत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विकास कामाच्या अंदाजपत्रके व आराखड्यांना तांत्रिक मान्यता देण्याकरीता अंदाजित किंमतीच्या १% इतके शुल्क आकारण्यास मान्यता प्रदान करण्यात आली आहे. त्यानुसार मजीप्रा परिपत्रक क्र.१५७ दि.०२.०८.२०१४ अन्वये सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

- उपरोक्त शासन निर्णयानुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास ईटीपी व तांत्रिक सेवा शुल्कापोटी प्राप्त होणारे उत्पन्न महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने शासनाकडे दरमहा जमा करावयाचे असल्याने विषयांकित कामाचे तांत्रिक छाननी शुल्क भरण्यापासुन सुट मिळण्याबाबत मा. संचालक मंडळाच्या बैठकीत चर्चा होऊन निर्णय होणे विषयी विनंती करण्यात येत आहे.

उपरोक्तप्रमाणे कार्यक्रम बाबीवर सविस्तर चर्चा होऊन पुढीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव :-**

असा ठराव करण्यात येतो की, शासनाच्या पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचा शासन निर्णय क्र. मजीप्रा-२०१४/प्र.क्र.३३(अ)/पापु-२३, दि.२३.०३.२०१७ नुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास ईटीपी व तांत्रिक सेवा शुल्कापोटी प्राप्त होणारे उत्पन्न महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने शासनाकडे दरमहा जमा करावयाचे असल्याने विषयांकित कामाचे तांत्रिक छाननी शुल्क भरण्यापासून सूट देण्यात येऊ नये.

याबाबत पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**आयत्या वेळेची कार्यक्रम बाब क्र.२ :-**

**विषय :-** शिरभावी व ८१ गांवे प्रादेशिक पाणी पुरवठा योजना ता.सांगोला जि.सोलापूर दैनंदिन देखभाल व दुरुस्ती करणेबाबत.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, संचालक मंडळाची १५७ वी बैठक दि.३०.०९.२०२४ रोजी संपन्न झाली. सदर बैठकीत सदर योजनेच्या आर्थिक तुटीचा रू ४१२३.३१ लक्ष रकमेचा प्रतिपूर्ती प्रस्ताव (सन २००५ ते डिसेंबर २०२३ पर्यंतचा) दि. २६.०७.२०२४ रोजीच्या पत्रान्वये शासनाकडे सादर करण्यात आलेला असून तुटीची प्रतिपूर्ती शासनाकडून अद्याप झालेली नाही. आर्थिक तुटीची प्रतिपूर्ती पुढील ३ महिन्यांच्या कालावधीमध्ये शासनाकडून प्राप्त झाल्यास योजनेची देखभाल व दुरुस्ती महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत चालू ठेवावी. अन्यथा ३ महिन्यानंतर योजनेची देखभाल व दुरुस्ती महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत बंद करण्यात यावी. संचालक मंडळाने मान्यता प्रदान करुन खालील प्रमाणे ठराव पारित केला.

**ठराव :-**

सदर योजनेच्या आर्थिक तुटीचा रू.४१२३.३१ लक्ष रकमेचा प्रतिपूर्ती प्रस्ताव (सन २००५ ते डिसेंबर २०२३ पर्यंतचा) दि. २६.०७.२०२४ रोजीच्या पत्रान्वये शासनाकडे सादर करण्यात आलेला असून तुटीची प्रतिपूर्ती शासनाकडून अद्याप झालेली नाही. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे योजनेसाठी कोणतेही अनुदान प्राप्त होत नाही.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

सदर योजनेच्या वसुलीचे प्रमाण कमी असल्याने महाराष्ट्र राज्य वीजवितरण कंपनी, कंत्राटदार इत्यादींचे रू.७६२.९५ लक्ष इतकी देयके प्रलंबित आहेत.

१) शिरभावी व ८१ गांवे प्रादेशिक पाणी पुरवठा योजना,ता.सांगोला,जि.सोलापूर या योजनेच्या वार्षिक देखभाल व दुरुस्ती खर्चाच्या आर्थिक तुटीची प्रतिपुर्ती शासनाकडून प्राप्त करुन घेण्यासाठी मुख्य अभियंता यांनी शासन स्तरावर पाठपुरावा करावा. आर्थिक तुटीची प्रतिपूर्ती पुढील ३ महिन्यांच्या कालावधीमध्ये शासनाकडून प्राप्त झाल्यास योजनेची देखभाल व दुरुस्ती महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत चालू ठेवावी. अन्यथा ३ महिन्यानंतर योजनेची देखभाल व दुरुस्ती महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत बंद करण्यात यावी.

२) सदर योजनेच्या पाणीपट्टीच्या वसुलीची जबाबदारी मुख्य अभियंता यांची राहील. पाणी पट्टीची पूर्ण वसूली होईल याबाबत मुख्य अभियंता यांचे नियोजन व संनियंत्रण राहील.

३) सदर योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत चालविण्याकरीता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास जी काही आर्थिक तुट येईल त्याची भरपाई करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करुन त्याची प्रतिपूर्ती मागणी करण्यात यावी.

या बाबत पुढील कार्यवाही करण्यास मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण पुणे यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**आयत्या वेळेची कार्यक्रम बाब क्र.३ :-**

**विषय :-** तिल्लारी प्रकल्पावर आधारीत पाणी पुरवठा योजना जि.सिंदुधूर्गनगरी योजनेतून लाभार्थी ग्रामपंचायत, वेंगुर्ला शहर व मार्गस्थ औद्योगिक क्षेत्र, पर्यटन स्थळासाठी ठोक स्वरुपात पाणी पुरठयाकरीता दर निश्चित करणेबाबत.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, संचालक मंडळाची १५७ वी बैठक दि.३०.०९.२०२४ रोजी संपन्न झाली. सदर बैठकीत तिल्लारी प्रकल्पावर आधारीत पाणी पुरवठा योजना जि. सिंधुदुर्गनगरी योजनेतून लाभार्थी ग्रामपंचायत, वेंगुर्ला शहर व मार्गस्थ औदयोगिक क्षेत्र, पर्यटन स्थळासाठी ठोक स्वरुपात पाणी पुरवठ्याकरीता दर निश्चित करणे पाण्याची मागणी असलेल्या व तातडीने पाणी पुरवठा करणे शक्य असलेल्या लाभार्थ्यांकरिता १ वर्षाकरिता तिलारी प्रकल्पावर आधारित पाणी पुरवठा योजना दौडामार्ग, सावंतवाडी व वेंगुर्ला तालुक्यातील समुद्र किनाऱ्यावरील १७ गावे व वेंगुर्ला शहर, ७ पर्यटन स्थळे व ४ औद्योगिक क्षेत्रासाठी पाणी पुरवठा करण्याकरिता मुख्य अभियंता, ठाणे यांनी प्रस्तावित केल्यानुसार खालील पाणीपट्टी दर आकारण्यास मान्यता देण्यात येत आहे. संचालक मंडळाने मान्यता प्रदान करुन खालील प्रमाणे ठराव पारित केला.

**ठराव :-**

१) तिलारी प्रकल्पावर आधारित पाणी पुरवठा योजनेकरिता वरील परिगणन करण्यात आलेले रु.३५.६४ प्रती हजार लिटर्स इतक्या दरानुसार पाणी पुरवठयाचा दर पुढे प्रस्तावित केल्यानुसार दिनांक १ ऑक्टोबर, २०२४ पासून अथवा ज्या दिनांका पासून अधिसूचित करण्यात येईल त्या दिनांकापासून आकारण्यात यावेत.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

| वापराचा प्रवर्ग | सन २०२४-२५ या प्राथमिक आर्थिक वर्षासाठी प्रस्तावित दर |
|---|---|
| घरगुती नळ (० ते १५००० लिटर्स पर्यंत) | ९.०० प्रती १००० लिटर्स |
| (१५००१ ते २५००० लिटर्स पर्यंत) | १४.०० प्रती १००० लिटर्स |
| (२५००० लिटर्स च्या पुढे) | १६.०० प्रती १००० लिटर्स |
| व्यावसाईक पर्यटन | ४१.०० प्रती १००० लिटर्स |
| औद्योगिक | ६१.० प्रती १००० लिटर्स |

२) उपरोक्त दर योजनेच्या चाचणी कालावधीच्या दिनांक १ ऑक्टोबर, २०२४ रोजी पासून पुढील एका वर्षाच्या कालावधीकरिता लागू करण्यात यावेत. सद्यस्थितीत योजनेतून चाचणी स्वरूपात पाणी पुरवठा सुरु करण्यात आलेला आहे. योजनेच्या चाचणी कालावधी चालविण्यासाठी आलेला प्रत्यक्षातील खर्च, योजनेचे सुरळीत संचलन सुरु झाल्यानंतर योजना चालविण्यासाठी घसारा धरून भविष्यातील अंदाजित सरासरी खर्च त्यानुसार लाभार्थी यांना पाणी पुरवठ्याचे प्रमाण यानुसार पुढील पाणी दर निश्चित करण्यात यावेत व त्यास महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या बैठकीत मान्यता घेऊन पुढील दर अधिसूचित करावे.

३) योजनेतून पाणी पुरवठा करण्याकरिता सुरक्षा अनामत रक्कम, कमीत कमी पाणी आकारणी, मुख्य गुरुत्ववाहिनी नळ जोडणी रक्कम, विलंब आकारणी तसेच त्वरित प्रदानासाठी सूट या बाबी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीच्या पाणी पुरवठा योजनांकरीता शासनामार्फत प्राधिकृत प्रकाशन करण्यात येणाऱ्या अधिसूचनेनुसार दिनांक १ ऑक्टोबर, २०२४ पासून पुढील आदेशापर्यंत लागू करण्यात यावेत.

४) योजनेतून पाणी पुरवठा करण्यासाठी लाभार्थांसोबत लाभार्थांची कर्तव्य व जबाबदारी नमूद करून आवश्यक करारनामा करण्यात यावा. सदर करारनाम्याच्या मसुदा मंजुरीकरिता सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

५) तिल्लारी प्रकल्पावर आधारीत पाणी पुरवठा योजना जि. सिंधुदुर्गनगरी या योजनेच्या वार्षिक देखभाल व दुरुस्ती खर्चाच्या आर्थिक तुटीची प्रतिपुर्ती शासनाकडून प्राप्त करुन घेण्यासाठी मुख्य अभियंता यांनी शासन स्तरावर पाठपुरावा करावा. सदर योजनेच्या पाणीपट्टीच्या वसुलीची जबाबदारी मुख्य अभियंता यांची राहील. पाणी पट्टीची पूर्ण वसूली होईल याबाबत मुख्य अभियंता यांचे नियोजन व संनियंत्रण राहील.

६) सदर योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत चालविण्याकरीता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास जी काही आर्थिक तुट येईल त्याची भरपाई करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करुन त्याची प्रतिपूर्ती मागणी करण्यात यावी.

या बाबत पुढील कार्यवाही करण्यास मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रादेशिक विभाग, ठाणे यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.